**प्रेसनोट** **दिनांक - १६/०६/२०२६**

पोलीस उप आयुक्त, मध्य- परि ०२
भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई

**‘‘ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरुन मिळालेल्या चालकानेच केली वाहन चोरी ; आरोपी अटक‘‘**

तक्रारदार नामे डॉ. प्रतिक राजन मुणगेकर,३१ वर्षे यांनी दिनांक १०/०६/२६ रोजी रात्री त्यांची मारुती व्हॅगनर क्र.एमएच-०१-ईव्ही-२६७७ ही ते राहत असलेल्या इंडीया युनायटेड मिल्स चाळ,(सिमेंट चाळ) च्या समोर, उत्तर वाहीनीवर, डॉ.बी.ए.रोड, परेल, मुंबई-१२ येथे रस्त्याच्या कडेला पार्क करुन ठेवली होती परंतु दिनांक १०/०६/२६ रोजी सकाळी त्यांची नमुद गाडी कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांची संमतीशिवाय लबाडीने चोरुन नेली म्हणुन त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात इसमाविरोधात गुरक्र. २२९/२६ कलम ३०३(२) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

तपासादरम्यान तक्रारदार यांचेकडे सखोल चौकशी केली असता माहिती मिळाली की तक्रारदार यांना गाडी चालवता येत नसुन ते गाडी चालविण्यासाठी ऑनलाईन चालक मागवत असतात. त्यामुळे मागील वर्षभरात त्यांनी सेवा घेतलेल्या चालकांचे मोबाईल क्रमांक प्राप्त करुण त्याचे तांत्रिक विश्लेषण केले असता एका चालकाचे मोबाईल लोकेशन हे गुन्हा घडला त्यावेळी घटनास्थळ परीसरातील असल्याचे निदर्शनास आले. तपासादरम्यान आरोपीत हा उल्हासनगर येथे असल्याचे आढळले. त्यानुसार दोन दिवस उल्हासनगर या परीसरात सापळा लावुन शोध घेतला असता, नमुदचा आरोपीत इसम फैजान अबसार अहमद शेख, ३५ वर्षे, मुळ राहणार उत्तर प्रदेश हा मिळुन आला. त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडुन गुन्हयात चोरलेले वाहन मारुती व्हॅगनर क्र.एमएच-०१-ईव्ही-२६७७ ही हस्तगत करण्यात आली.

सदरची कामगिरी ही श्री देवेन भारती, मा पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री मनोजकुमार शर्मा, मा पोलीस सह आयुक्त (का व सु), बृहन्मुंबई, श्री विक्रम देशमाने, मा अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई, श्री अनुराग जैन, पोलीस उप आयुक्त, मध्य-परिमंडळ ०२, मुंबई, श्री घनश्याम पलंगे, सहायक पोलीस आयुक्त, भोईवाडा विभाग, मुंबई, श्री दत्तात्रय ठाकुर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई आणि पो.नि.(गुन्हे) नितीन महाडीक यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउनि.सचिन बोरसे, पो.ह.महादेव माळी, पो.ह. नितीन धंगेकर, पो.शि. जयदिप पाटील, पो.शि.हेमंत सुळे, पो.शि. पंकज रोकडे, पो.हवा.गोविंद ठोके (तांत्रिक मदत ) यांनी केली आहे.

***